# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १८/०५/२००६

आज दि. १८/०५/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. ०८/०५/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ४) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ५) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ६) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ८) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ९) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १०) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ११) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १३) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १४) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १५) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १६) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १७) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १९) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २०) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २१) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २२) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २३) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २४) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २५) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| २६) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २७) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| २८) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| २९) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३०) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३१) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३२) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३३) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३४) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ३५) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ३६) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ३७) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ३८) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ४०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४१) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४२) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ४३) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ४४) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ४५) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ४६) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ४७) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ४८) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ४९) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ५०) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ५१) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५२) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ५३) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५४) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५५) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ५६) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ५७) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ५८) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ५९) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| २) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| ६) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ७) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| ८) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ९) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| १०) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ११) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| १२) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| १३) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| १४) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| १५) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| १६) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| १७) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| १८) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ४) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ५) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ६) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ७) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, आजच्या मा. महासभेला सुरूवात करण्या अगोदर आजची महासभा ही १० मिनिटासाठी तहकूब करावी असा मी या सभागृहासमोर ठराव मांडत आहे. दि. ३ मे, २००६ रोजी भाजपाचे राजकीय नेते श्री. प्रमोदजी महाजन यांचे अत्यंत दुर्देवीरित्या निधन झालेले आहे. त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी आजची सभा ही १० मिनिटांसाठी तहकूब करावी असा मी या सभागृहासमोर ठराव मांडतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

अनुमोदन आहे.

**ठराव क्र. १६ :-**

दि. ३ मे, २००६ रोजी भाजपाचे राजकीय नेते श्री. प्रमोदजी महाजन यांचे अत्यंत दुर्देवीरित्या निधन झालेले आहे. त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी आजची सभा ही १० मिनिटांसाठी तहकूब करावी असा मी या सभागृहासमोर ठराव मांडतो.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**धनराज अग्रवाल :-**

मी शोक प्रस्ताव मांडतो.

(प्रस्तावाचे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

शोक प्रस्ताव मांडत आहे. भारतीय जनता पार्टीच सरचिटनिस माजी केंद्रीय मंत्री महाराष्ट्राचे उमेदी नेतृत्व व राजकारणाला व्यवस्थापन शास्त्राची जोड देणारे कार्यक्षम लोकप्रतिनिधी स्वर्गीय प्रमोद महाजन ह्यांच्या स्मृतीस मिरा भाईंदर महानगरपालिकेची ही मा. महासभा विनम्र श्रद्धांजली अर्पण करित आहे. अंबेजोगाई सारख्या लहान गावात शिक्षकाच्या पोटी जन्म घेउन स्वकर्तृत्वावर केवळ महाराष्ट्रातच नव्हेतर राष्ट्रीय राजकारणावर ही आपला ठसा उमटवणारे प्रमोद महाजन ह्यांचे एक आगळे व्यक्तिमत्व होते. आपल्या विचारसरणीवर दृढ राहून अन्य पक्षामध्ये ही त्यांनी आपल्या वागणूकीने अनेक मित्र जोडले होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे दिल्लीतील एक प्रभावीशाली नेतृत्व अस्तास गेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात उत्तन येथील केशवसृष्टीमध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधीनी सारखी एक वेगळी संस्था उभी करून तिला आंतरराष्ट्रीय दर्जा प्रमोद महाजन ह्यांनी प्राप्त करून दिले व मिरा भाईंदर शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवले. आपले लोकप्रतिनिधी हे प्रशिक्षित असावे या हेतूने सुरू करण्यात आलेला म्हाळगी प्रबोधनीचा लाभ आपल्या महापालिकेचे लोकप्रतिनिधींनी सुध्दा घेतला आहे. या संस्थेमुळे देशाचे माजी पंतप्रधान मा. अटल बिहारी वाजपेयी ह्यांचा मिरा भाईंदर शहरात भेटीचा योग जुळून आला होता. प्रमोद महाजन ह्यांच्या अकाली व दुर्दैवी निधनाने आधुनिक विचाराचा जनमाणसावर आपल्या कर्तृत्वाने स्थान मिळवलेले लोकशाही विकासासाठी एकनिष्ठ राहून डॉलरपेक्षा रूपया मजबूत करण्याचे स्वप्न पाहणारा आणि राजकीय विरोधकांनाही निरपेक्ष मैत्रिच्या नात्याने बांधून ठेवणारे असाधारण नेता महाराष्ट्राने गमावलेला आहे. महाराष्ट्राच्या या महान सुपुत्राला मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेची विनम्र आदरांजली.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम एस.टी बसचे पण घ्या ना.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम च्या परवानगीने बोलतो की, २ मे रोजी टी.एम.टी. बसचा जो अपघात झाला. त्याच्यामध्ये ३० ते ३५ लोक मरण पावले. त्याच्यासाठी सुद्धा १० मिनिट श्रद्धांजलीमध्ये त्याचा समावेश करण्यात यावा. असा मी ठराव मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. तसेच, आपले नगरसेवक श्री. प्रकाश दुबोले यांची मावशी ॲडव्होकेट शिवाजी यादव यांच्या मातोश्री हौसाबाई दत्तू यादव यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्याच्यासाठी आपण हा शोक प्रस्ताव पास करावा.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, मोदी पटेल रोडवर राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते दिपक नांदीवडेकर यांचे अचानक निधन झालेले आहे. तर आपण ते पण इन्क्ल्युड करून घ्यावे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, भारताचे व भाजपचे नेते प्रमोद महाजन यांचे ३ मे रोजी निधन झाले. त्यांनी आपल्या देशावर पर्यायाने महाराष्ट्रावर शोककळा पसरली होती. महाराष्ट्रातील बऱ्याचशा विकासाच्या कामामध्ये खासदार व भाजप नेता म्हणून त्यांनी त्याची मुख्य भुमिका याठिकाणी बजावली होती. पर्यायाने महाराष्ट्राची जी मोठी हानी झालेली आहे. ही आपण भरून काढू शकत नाही. सर्व सामान्यातून जिल्ह्यातून महाराष्ट्रात, महाराष्ट्रातून देशात जाणाऱ्या अनेक नेत्यांपैकी एक मोठे नेतृत्वाला आपण या ठिकाणी हरपलेले आहे. त्यामुळे असा तसा नेता होणे नाही. अशा पद्धतीने आपल्या महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान झालेले आहे. मी व माझा पक्ष यासाठी त्यांना आदरांजली वाहत आहे. त्याचबरोबर टी.एम.टी ची याठिकाणी परिवहन सेवा सुरू आहे. यामध्ये जवळ जवळ ३५ लोक याठिकाणी मृत्युमुखी पडली. तसेच, माजी नगरसेवक श्री. थॉमस डिसोझा यांचे बंधू पॅसेज डिसोझा व सभागृहामध्ये सर्व नगरसेवकांनी ज्यांची नावे घेतली. आपण त्यांना ही आदरांजली वाहतो आणि सभागृह नेते हॅरल बोर्जीस यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या शोक प्रस्तावाच्या निमित्ताने सभा तहकूब करून पुढे चालवावी असा मी या ठिकाणी माझा प्रस्ताव मांडत आहे. धन्यवाद.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, की याच्यात एक नाव राहिलेले आहे. लक्ष्मीबाई पांडूरंग पाटील यांचे दि. १२/०५/०६ रोजी देवाज्ञा झालेली आहे. तर ह्यांचे नाव देखिल शोक प्रस्तावत घेण्यात यावे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, भाजपाचे जेष्ठ नेते आणि महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या राजकारणामध्ये महत्वाचे स्थान असलेले मा. श्री. प्रमोद महाजन ह्यांचे दुःखद निधन झाले. महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये धुरंदर राजकारणी म्हणून आणि एक अजात शत्रू म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल. ज्यांनी महाराष्ट्राला देशाच्या इतिहासावर चांगल्या रितीने मिरविले. भाजपाचा कायापालट केला परंतु, महाराष्ट्राचे नाव देखील देशाच्या इतिहासामध्ये चांगल्या प्रगतीने रोवले. अशा दिवंगत नेत्याला आणि अजात शत्रू व्यक्तीला आणि धुरंदर राजकाराणाला मिरा भाईंदर महानगरपालिके तर्फे आणि कॉंग्रेस आय पक्षातर्फे आमची ही भावपुर्वक श्रद्धांजली. धन्यवाद.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो भारतीय जनता पार्टीचे धुरंदर आणि भारतीय जनता पार्टीचे शिवसेनेचे नितीचे शिल्पकार म्हणून ज्यांना संबोधले जाते. माजी केंद्रीय मंत्री आणि महाराष्ट्राचे सर्वांचे विकासामध्ये सहभागी होणारे. तसेच आपल्या सर्वांमध्ये सर्व पक्षाचे संबंधित असलेले फक्त सेवा हेच त्यांचे कार्यकाल आपल्यातुन निघुन गेल्यामुळे आपल्या देशाचे फार मोठे नुकसान झालेले आहे. त्यांना शिवसेने तर्फे मी श्रद्धांजली अर्पण करतो.

**मा. महापौर :-**

भाजपाचे राष्ट्रीय नेते आदरणीय स्वर्गीय प्रमोद महाजन साहेब, यांचे दि. ३ मे रोजी दुखःद निधन झाले. ते पुर्ण देश पातळीवर फार मोठा आघात झाला. आधुनिक युगाचे नेते यांच्या अंतामुळे राजकीय क्षेत्रातील एक चमकता तारा आज आपल्यात नाही व तसेच मा. महासभेने विविध मृत्युमुखी झालेल्या चेना येथे घडलेल्या दुर्घटने मध्ये ठाणा टी.एम.टी च्या बसमध्ये सर्व मृत्युमुखी पडलेल्या शहरवासियांना तसेच सदस्यांनी आपल्या भावनेतुन मिरा भाईंदर शहरातील जे आज आपल्यामध्ये नाहीत यांच्या नावाचा उल्लेख करून आज आपण त्याना आदरपुर्वक श्रद्धांजलीचा कार्यक्रम करत आहोत त्यामुळे आजची सभा या नंतर १० मिनिटाकरिता तहकूब केली जाईल व पून्हा पुढील कामकजाला मा. सभागृहात कामकाज सुरू होईल.

**दुःखवटा ठराव क्र. १७ :-**

भारतीय जनता पार्टीच सरचिटनिस माजी केंद्रीय मंत्री महाराष्ट्राचे उमेदी नेतृत्व व राजकारणाला व्यवस्थापन शास्त्राची जोड देणारे कार्यक्षम लोकप्रतिनिधी स्वर्गीय प्रमोद महाजन ह्यांच्या स्मृतीस मिरा भाईंदर महानगरपालिकेची ही मा. महासभा विनम्र श्रद्धांजली अर्पण करित आहे. अंबेजोगाई सारख्या लहान गावात शिक्षकाच्या पोटी जन्म घेउन स्वकर्तृत्वावर केवळ महाराष्ट्रातच नव्हेतर राष्ट्रीय राजकारणावर ही आपला ठसा उमटवणारे प्रमोद महाजन ह्यांचे एक आगळे व्यक्तिमत्व होते. आपल्या विचारसरणीवर दृढ राहून अन्य पक्षामध्येही त्यांनी आपल्या वागणूकीने अनेक मित्र जोडले होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे दिल्लीतील एक प्रभावशाली नेतृत्व अस्तास गेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात उत्तन येथील केशवसृष्टीमध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधीनी सारखी एक वेगळी संस्था उभी करून तिला आंतरराष्ट्रीय दर्जा प्रमोद महाजन ह्यांनी प्राप्त करून दिला व मिरा भाईंदर शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवले. आपले लोकप्रतिनिधी हे प्रशिक्षित असावे या हेतूने सुरू करण्यात आलेल्या म्हाळगी प्रबोधनीचा लाभ मिरा भाईंदर महापालिकेचे लोकप्रतिनिधींनी सुद्धा घेतला आहे. या संस्थेमुळे देशाचे माजी पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी ह्यांचा मिरा

भाईंदर शहरात भेटीचा योग जुळून आला होता. प्रमोद महाजन ह्यांच्या अकाली व दुर्दैवी निधनाने आधुनिक विचाराचा जनमाणसावर आपल्या कर्तृत्वाने स्थान मिळवलेले लोकशाही विकासासाठी एकनिष्ठ राहून डॉलरपेक्षा रूपया मजबूत करण्याचे स्वप्न पाहणारा आणि राजकीय विरोधकांनाही निरपेक्ष मैत्रीच्या नात्याने बांधून ठेवणारा असाधारण नेता महाराष्ट्राने गमावलेला आहे. महाराष्ट्राच्या या महान सुपुत्राला मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेची विनम्र आदरांजली.

त्याचप्रमाणे २ मे रोजी टी.एम.टी. बसचा जो अपघात झाला. त्याच्यामध्ये ३० ते ३५ लोक मरण पावले आहेत. तसेच सन्मा. नगरसेवक श्री. प्रकाश दुबोले यांची मावशी, ॲडव्होकेट शिवाजी यादव यांच्या मातोश्री हौसाबाई दत्तू यादव यांच वृद्धापकाळाने निधन झाले. मोदी पटेल रोड येथे राहणारे राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते दिपक नांदीवडेकर यांचे अचानक निधन झालेले आहे. माजी नगरसेवक श्री. थॉमस डिसोझा यांचे बंधू पॅसेज डिसोझा यांचेही दुःखद निधन झालेले आहे. तसेच लक्ष्मीबाई पांडूरंग पाटील यांना दि. १२/०५/०६ रोजी देवाज्ञा झालेली आहे. त्या सर्वांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी असून सर्वांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. धनराज अग्रवाल.** **अनुमोदन :- श्री. शरद पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी श्रद्धांजलीसाठी जागेवर उभे रहायचे आहे.

(सभागृहात दोन मिनिटे शांतता राखण्यात आली.)

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांचे आभार मानून सभा तहकुब करित आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सकाळी ११.४० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**